संकेतस्थळ :- www.transport.maharashtra.gov.in
ई-मेल - dytccomp.tpt-mh@gov.in/commr.comp@gmail.com
०२२-२६४१६४९८

क्र.पआका/का.११/संगणक/CSCशुल्क/२०१७-१८ आ. क्र. 2865

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०००५१.

**दिनांक-** 20 FEB 2018

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
सर्व प्रादेशिक परिवहन /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय.

**विषय:-** CSC ई-गर्व्हन्स सर्विसेस इंडीया यांच्या मार्फत पुरविल्या जाणाऱ्या ऑनलाईन सेवांकरिता शुल्क आकारणी बाबत.
**संदर्भ:-** एमव्हिडी- १११६/प्र.क्र.४९९/परि-४ दिनांक २९.११.२०१७ रोजीचे शासन पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, परिवहन विभागाच्या www.parivahan.gov.in या पोर्टलवरील सर्व ऑनलाईन सेवा नागरिकांना देण्याकरिता CSC ई-गर्व्हन्स सर्विसेस इंडीया प्रा.लि. यांच्यासोबत दिनांक १०.०६.२०१५ रोजी २ वर्षाकरिता सामंजस्य करार करण्यात आला होता. सदर कराराची मुदत दिनांक ०९.०६.२०१७ रोजी संपुष्टात आली आहे.यास्तव परिवहन विभाग व CSC ई-गर्व्हन्स सर्विसेस इंडीया प्रा.लि. यांच्यासोबत पुढील २ वर्षाकरिता कराराचे नुतनीकरण करण्यास अशा सेवा पोस्ट ऑफिस,राष्ट्रीयकृत बॅंका, वाहन वितरक तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचेव्दारे उपलब्ध करुन देण्यास व सेवांचे दर रुपये २०/- ऐवजी रुपये १००/- असे आकारण्यास शासनाने दिनांक २९.११.२०१७ रोजीच्या शासन पत्राव्दारे मान्यता प्रदान केली आहे.

प्राप्त शासन मान्यतेनुसार मे. CSC ई-गर्व्हन्स सर्विसेस इंडीया प्रा.लि. यांच्यासोबत या संदर्भाने पुढील २ वर्षाकरिता सामंजस्य करार दिनांक ०८.१२.२०१७ रोजी करण्यात आला आहे. **(कराराची प्रत सलग्न)**

प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त विषयाच्या संदर्भांकीत शासन मान्यतेनुसार CSC केंद्रामार्फत शुल्क स्विकारण्याबाबत स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देण्यात यावी. कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर माहिती दयावी.

**परिवहन उपायुक्त (संगणक)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**सहपत्र:-** वरिलप्रमाणे

**प्रत - M/s CSC e- Goverence Services Inida Limited, Electronics Niketan, 4th Floor, DIT, Programme Unit, 6, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-1 10003.**

Scanned by CamScanner